# D.G. ASSOCIATES

**A Sister Concern of Merisis Consultants Private Limited**
**"Division of Society Plus"**
**Address:** Office No.145, 3rd Floor Prestige Point, Shukrawar Peth Pune 411002.
Ph. No. (O) 24488837/8/9. (M) 93700 99889
***Project Management Consultancy for Redevelopment***

दिनांक:-१६/०१/२०२५

प्रति,
सर्व सभासद
मार्फत
मा.चेअरमन/सेक्रेटरी
देवव्रत अपार्टमेंटस्
हिस्सा नं.०९,ब्लॉक नं.०१,विठ्ठल मंदिर रोड,
श्रीराम सोसायटी जवळ,कर्वेनगर,पुणे.४११ ०५२.

**विषय:- आपले संस्थेचे पुनर्विकास प्रकल्पाचे कामाबाबत**

स.महोदय,

सर्वप्रथम देवव्रत अपार्टमेंटस् संस्थेचे सर्व पदाधिकारी व सभासद यांना आपण आमच्या संस्थेची प्रकल्प सल्लागार म्हणुन निवड केल्याबद्यल हार्दिक धन्यवाद.

संस्थेने आमची निवड केल्यानंतर प्रकल्प सल्लागार म्हणनु पुढे तुम्ही काम पाहावे असे संस्थेच्या पुनर्विकास समितीतर्फे सांगण्यात आले तसे आम्ही आमचे Quotation ०४-०३-२०२४ ला संस्थेकडे देण्यात आले. त्यानंर घेतलेल्या निर्णयाला अनुसरून पुढील कार्यवाहीचे स्वरूप ठरविणे अपेक्षित होत त्याप्रमाणे कार्यवही सुरु करण्यात आली.

त्यानुसार सदर कामाबाबत पुढील कार्यवाहीचे स्वरूप ठरविणेपुर्वी सर्व गोष्टींचा अभ्यास करणेकामी पुनर्विकास प्रक्रियेत संस्थेने प्रथम प्रत्येक सदनिका आणि शॉपधारक यांची रेरा कारपेटप्रमाणे मोजणी करून घेऊन त्याची सॉफ्ट कॉपी संस्थेच्या Whats Group ला देण्यात आली कारण, आपण हे रेरा कारपेटप्रमाणे मोजणी करून घेतलेले एरिया प्रत्येक विकसकाला टेंडरसोबत दिले गेले पाहिजेल त्यामुळे आपण हे एरिया मोजणी करून घेण्याचे संस्थेच्या समितीने ठरविले.

# D.G. ASSOCIATES

**A Sister Concern of Merisis Consultants Private Limited**
**"Division of Society Plus"**
**Address:** Office No.145, 3rd Floor Prestige Point, Shukrawar Peth Pune 411002.
Ph. No (O) 2448837/8/9. (M) 93700 99889
***Project Management Consultancy for Redevelopment***

त्यानंतर निविदा प्रोसेसची प्रक्रिया ही संस्थेचे प्रकल्प सल्लागार यांच्या ऑफिसमधुनच करावी असे ठरले. आपण ३ ऑक्टोंबर ते ९ नोव्हेंबर पर्यंत सुरू ठेवली होती दरम्यानच्या काळामध्ये दिवाळी सणामुळे आवश्यक तेवढया निविदा विकसक घेऊन गेले नव्हते, त्यानंतर संस्थेच्या पुनर्विकास समितीने या सगळया गोष्टींचा आढावा लक्षात घेऊन दिनांक ९ नोव्हेंबर च्या ऐवजी दिनांक ९ डिसेंबर पर्यंतचा कालावधी वाढवावा असे ठरले. या दरम्यानच्या काळामध्ये पुनर्विकास समितीने घेतलेला निर्णय हा योग्य होता त्याचे कारण असे की, ११ विकसकांनी निविदा घेऊन गेले आणि ११ विकसकांनी सोसायटी प्लसच्या ऑफिसमध्ये सिलबंद निविदा जमा केल्या होत्या, त्यानंतर ज्या ११ विकसकांनी निविदा जमा केल्या होत्या, त्याचे टेंडर ओपनिंग दिनांक २६/१२/२०२४ ला संस्थेचे प्रकल्प सल्लागार म्हणजेच सोसायटी प्लसच्या ऑफिसमध्ये करण्यात आले होते, त्यामध्ये कोणत्या विकसकांनी किती ऑफर दिली त्या वाचनु दाखविण्यात आल्या होत्या.

प्रकल्प सल्लागार यांच्यामार्फत ११ विकसकांचा तुलनात्मक तक्ता (Developer's Comparison Chart) तयार करून देण्यात आला. त्यानंतर संस्थेच्या पुनर्विकास समितीमध्ये विकसकांना शॉर्टलिस्ट करून त्यांना संस्थेच्या सभासदांसमोर प्रेझेंन्टेशनसाठी आमंत्रित करण्याचे ठरले. त्याप्रमाणे दिनांक **०२/०२/२०२५ रोजी युनायटेड वेस्टन हॉल, ताथवडे उद्यानाजवळ, कर्वेनगर,पुणे.** येथे विकसकांनी येऊन आपाआपले प्रेझेंनटेशन सादर करण्याचे ठरविण्यात आले आहे, तरी सर्व सभासदांनी या विकसकांच्या प्रेझेंन्टेशनसाठी उपस्थित राहायचे आहे. संस्थेकडे हे पत्र सुपुर्त करताना विकसकांच्या तुलनात्मक तक्त्याची (Developer's Comparison Chart) प्रत या पत्रासोबत जोडत आहोत, या (Developer's Comparison Chart) मध्ये काही शंका असल्यास त्याबद्यलच्या सुचना सभासदांनी दिनांक २७/०१/२०२५ रोजी पर्यंत संस्थेच्या पुनर्विकास समितीकडे देण्यात यावे याची सभासदांनी नोंद घ्यावी ही विनंती.

**For D. G. Associate**

D. C. Gaikwad

**Proprietor**